# CORRIGENDUM NOTIFICATION (सुधारीत सूचना)

# MHADA RECRUITMENT - 2021 EXAMINATION DATES

## म्हाडा सरळसेवा भरती - २०२१ परीक्षा दिनांक

म्हाडा सरळसेवा भरती-२०२१ मध्ये तांत्रिक व अतांत्रिक गटातील १४ संवर्गातील ५६५ पदे भरण्याकरीता दि.०५.१२.२०२१ व दि. १२.१२.२०२१ रोजी घेण्यात येणा-या परिक्षेबाबतची सूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. तथापि, दि.०४,०५ व ०६.१२.२०२१ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची राज्य सेवा परीक्षा २०२० मुख्य परीक्षा होणार आहे. यास्तव म्हाडा सरळसेवा भरती २०२१ च्या वेळापत्रकामध्ये बदल करण्यात येत असून परीक्षेचे सुधारीत वेळापत्रक खाली नमूद प्रमाणे आहे :-

| दिनांक | क्लस्टर | संवर्ग |
|---|---|---|
| १२.१२.२०२१ (सकाळचे सत्र) | क्लस्टर - १ | कार्यकारी अभियंता (स्थापत्य)<br>उप अभियंता (स्थापत्य)<br>सहायक अभियंता (स्थापत्य) |
| | क्लस्टर - ३ | सहायक विधी सल्लागार |
| १२.१२.२०२१ (दुपारचे सत्र) | क्लस्टर - ४ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) |
| १५.१२.२०२१ (दुपारचे सत्र) | क्लस्टर - ५ | कनिष्ठ वास्तुशात्रज्ञ सहायक |
| १९.१२.२०२१ (सकाळचे सत्र) | क्लस्टर - ७ | लघुटंकलेखक<br>स्थापत्य अभियांत्रिकी सहायक<br>भूमापक<br>अनुरेखक |
| १९.१२.२०२१ (दुपारचे सत्र) | क्लस्टर - ६ | सहायक<br>वरिष्ठ लिपीक<br>कनिष्ठ लिपीक-टंकलेखक |
| २०.१२.२०२१ (दुपारचे सत्र) | क्लस्टर - २ | मिळकत व्यवस्थापक/ प्रशासकीय अधिकारी |

वरील परीक्षेकरीता अर्ज केलेल्या उमेदवारांना हॉल तिकीट म्हाडा संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्याकरीता त्यांनी अर्ज भरताना नमूद केलेल्या इमेल आय डी व भ्रमणध्वनी क्रमांकावर सूचित करण्यात येईल. तसेच याबाबत संकेतस्थळावर (www.mhada.gov.in) देखील सूचना प्रसारीत करण्यात येईल.

**सचिव**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**

टीप - कोव्हिड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या अनुषंगाने उमेदवारांना सोबतच्या परिशिष्टानुसार सूचना देण्यात येत आहेत.

<u>परीशिष्ट</u>

**कोव्हिड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण सरळसेवा भरती - २०२१ परीक्षेकरीता मानक कार्यप्रणाली नुसार उमेदवारांना खालीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे :-**

१. परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश करताना किमान तीन पदरी कापडाचा मुखपट (Mask) परिधान करणे अनिवार्य आहे.
२. परीक्षा केंद्रावर सॅनिटाईझरची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल, त्याचा वापर दोन्ही सत्राकरीता (असल्यास) करणे अनिवार्य आहे.
३. परीक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान स्वच्छता (Cleanliness) तसेच आरोग्यास हितावह (Hygienic) वातावरण राखण्यासाठी हात वेळोवेळी सॅनिटाईझ करणे आवश्यक आहे.
४. कोव्हिड-१९ सदृश्य लक्षणे जसे की, ताप, सर्दी, खोकला इत्यादी दिसून येत असल्यास संबंधित परीक्षा केंद्रावरील पर्यवेक्षकीय अधिकारी/कर्मचारी यांना आगाऊ कळवावे. अशा उमेदवारांची स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात येईल.
५. उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर प्रवेश करताना तसेच परीक्षा केंद्राबाहेर जाताना शारीरिक/परस्पर अंतर (Social Distancing) राखणे अनिवार्य आहे.
६. वापरलेले टिश्यू पेपर, मुखपट, हातमोजे, सॅनिटाईझ पाऊच इत्यादी वस्तू कचराकुंडीमध्येच टाकाव्यात.
७. कोव्हिड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने केंद्र व राज्य शासन तसेच स्थानिक प्राधिकरणाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या सर्व सूचना/आदेश यांचे काटेकोरपणे पालन करावे.

**सचिव**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**